# स्वारातीम विद्यापीठाच्या 'सहयोग-२०१८' युवक महोत्सवाची जय्यत तयारी; उद्यापासून प्रारंभ

नांदेड-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव विद्यापीठ आणि सहयोग सेवाभावी संस्थेचे इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी, विष्णुपुरी नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२४ ते २७ सप्टेंबर या दरम्यान पार पडणाऱ्या युवक महोत्सवाची सहयोग एज्यूकेशनल कॅम्पसमध्ये जय्यत तयारी चालू आहे.

सोमवार, दि.२४ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता शोभायात्रा असून मानवी कौशल्ये : पारंपरिकतेकडून आधुनिकतेकडे हा विषय ठेवण्यात आला आहे. भारतरत्न डॉ. अटल बिहारी वाजपेयी सभामंडप (खुले) (मंच क्र.-१) वर सोमवार दि.२४ सप्टेंबर रोजी दुपारी १.०० वाजता पोवाडा, सायंकाळी ६ वाजता कव्वाली, मंगळवार, दि.२५ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता लावणी, दुपारी २ वाजता जलसा, बुधवार, दि.२६ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता लोकसंगीत, सकाळी १० वाजता लोकनृत्य/आदिवासी नृत्य या कलाप्रकारांचे सादरीकरण होणार आहे.

विजय चव्हाण - नाट्य विभाग (मंच क्र.-२) वर सोमवार दि.२४ सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजता मुकाभिनय, सायंकाळी ५ वाजता एकांकीका, मंगळवार, दि.२५ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता विडंबन(स्कीट), दुपारी २ वाजता एकांकिका, बुधवार, दि.२६ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता शास्त्रीय नृत्य, दुपारी १२ वाजता नक्कल या कलाप्रकारांचे सादरीकरण होणार आहे.

किशोरी आमोणकर कलामंच संगीत विभाग (मंच क्र.-३) वर सोमवार दि.२४ सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजता सुगम गायन (भारतीय), सायंकाळी ६ वाजता सुगम गायन (पाश्चात्त्य), मंगळवार, दि.२५ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता शास्त्रीय तालवाद्य, दुपारी २ वाजता शास्त्रीय सुरवाद्य, सायंकाळी ५ वाजता शास्त्रीय गायन, बुधवार, दि.२६ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता समुहगायन(भारतीय), दुपारी ०४ वाजता समूहगायन (पाश्चात्त्य) या कलाप्रकारांचे सादरीकरण होणार आहे.

विंदा करंदीकर मंच वाङ्मय विभाग (मंच क्र.-४) वर सोमवार दि.२४ सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजता आनंदी जीवनाची अनोखी रीत : हवे साहित्य, गीत आणि संगीत, जनआंदोलने : दशा आणि दिशा, पर्यावरण, मानव आणि केरळमधील महापुराची आपत्ती या तीन विषयांवर वक्तृत्व स्पर्धा आणि मंगळवार, दि.२५ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता भारताची शेतीविषयक धोरणे, शेती आणि शेतकरी हिताची आहेत/नाहीत? विषयावर वादविवाद स्पर्धा पार पडणार आहेत.

वासुदेव गायतोंडे मंच ललित कला विभाग (मंच क्र.-५) वर सोमवार दि.२४ सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजता कलात्मक जुळवणी (इंस्टॉलेशन), सायंकाळी ५ वाजता व्यंगचित्रकला, मंगळवार, दि.२५ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता स्थळछायाचित्रण, सकाळी ११ वाजता रांगोळी, दुपारी ३ वाजता पोस्टर मेकींग, बुधवार, दि.२६ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता कोलाज, सकाळी ११ वाजता चित्रकला, दुपारी ०२ वाजता मृदमूर्ती या स्पर्धा पार पडणार आहेत.

सहयोग-२०१८ विद्यापीठ युवक महोत्सवाचे उद्‌घाटन महाराष्ट्र राज्याचे शालेय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण विभागाचे मंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते सोमवार, दि.२४ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता पार पडणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप म्हैसेकर तर प्रमुख अतिथी म्हणून विधान परिषद सदस्य आ. राम पाटील रातोळीकर, लोहा-कंधार विधानसभेचे आ. प्रताप पाटील चिखलीकर, मुखेड विधानसभेचे आ. डॉ. तुषार राठोड, सुप्रसिध्द मराठी पार्श्वगायक मंगेश बोरगावकर आणि स्वागताध्यक्ष तथा सहयोग सेवाभावी संस्थेचे सचिव डॉ. संतुकराव हंबर्डे यांची उपस्थिती लाभणार आहे.

स्पर्धक व प्रशिक्षक, व्यवस्थापक यांना उत्कृष्ट सुविधा देण्यासाठी इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसीने नोंदणी समिती, स्वागत समिती, स्थानिक संयोजन समिती, स्टेज समिती, पाणी व विद्युत व्यवस्था समिती, निवास व्यवस्था समिती, प्रसिध्दी समिती, शिस्तपालन समिती, वाहतूक व्यवस्था समिती, सांस्कृतिक समिती, तक्रार निवारण समिती आदी समित्यांचे गठन केले असून विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजेश्वर दुडूकनाळे, इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य विश्वनाथ भरकड, सहयोग-२०१८ युवक महोत्सवाचे सचिव प्रा. प्रवीण मुळी, प्राचार्य डॉ. बालाजी गिरगावकर यांच्यासह विद्यार्थी विकास मंडळ आणि युवक महोत्सव सल्लागार समिती सदस्य युवक महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेत आहेत.

रविवार, दि. २३ सप्टेंबर २०१८ गोदातीर 6

# युवक महोत्सव उद्यापासून

नांदेड, दि. २२ : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव विद्यापीठ आणि सहयोग सेवाभावी संस्थेचे इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी, विष्णुपुरी, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२४ ते २७ सप्टेंबर यादरम्यान पार पडणाऱ्या युवक महोत्सवाची सहयोग एज्युकेशनल कॅम्पसमध्ये जय्यत तयारी चालू आहे.

या विद्यापीठ युवक महोत्सवाचे उद्‌घाटन राज्याचे शालेय शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते सोमवार, दि.२४ रोजी सकाळी ११.०० वाजता होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप म्हैसेकर तर प्रमुख अतिथी म्हणून आ. राम पाटील रातोळीकर, आ.प्रताप पाटील चिखलीकर, आ. डॉ. तुषार राठोड, सुप्रसिध्द मराठी पार्श्वगायक मंगेश बोरगावकर आणि स्वागताध्यक्ष तथा सहयोग सेवाभावी संस्थेचे सचिव डॉ. संतुकराव हंबर्डे यांची उपस्थिती लाभणार आहे.

सोमवार, दि.२४ सप्टेंबर रोजी सकाळी ८.०० वाजता शोभायात्रा असून मानवी कौशल्ये : पारंपरिकतेकडून आधुनिकतेकडे हा विषय ठेवण्यात आला आहे. भारतरत्न डॉ. अटल बिहारी वाजपेयी सभामंडप (खुले) (मंच क्र.-१) वर सोमवार दि.२४ सप्टेंबर रोजी दुपारी १.०० वाजता पोवाडा, सायंकाळी ६.०० वाजता कव्वाली, मंगळवार, दि.२५ सप्टेंबर रोजी सकाळी ८.०० वाजता लावणी असे विविध कार्यक्रम होणार आहेत.

प्रजावाणी रविवार, दि. २३ सप्टेंबर २०१८

# महाराष्ट्रातील तरूणांनी लोककला जागृत ठेवावी -डॉ. दिलीप म्हैसेकर



नवीन नांदेड (प्रतिनिधी)-स्वारातीम विद्यापीठा व सहयोग सेवाभावी संस्थेचे इंदिरा कॉलेज ऑफ फॉर्मसी यांच्या विद्याम ने सहयोग-२०१८ युवक महोत्सवाचा शुभारंभ कलामंच नंबर एक डॉ. आटलबिहारी वाजपेयी या कलामंचावरून प्रभारी कुलगुरू डॉ. दिलीप म्हैसेकर ,याच्या हास्ते दिप प्रज्वलन करून दि २४ सप्टेंबर रोजी झाला.यावेळी मार्गदर्शन करताना डॉ म्हैसेकर म्हणाले की लोककलाही महाराष्ट्राचा आत्मा आहे आणि ते तरूणानी ही लोककला जागृत ठेवावी आसे मत व्यक्त केले .

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव विद्यापीठ आणि सहयोग सेवाभावी संस्थेचे इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी, विष्णुपुरी, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२४ ते २७ सप्टेंबर यादरम्यान पार पडणाऱ्या युवक महोत्सवाची सुरूवात पार्शव गायक मंगेश बोरगावकर यांच्या गायनाने झाली यावेळी कलामंचकावर विद्यापीठचे प्रभारी कुलगुरू डॉ दिलीप म्हैसेकर, कुलसचिव डॉ. रमजान मुलानी, डॉ. रवि एन. सरोदे, मा. आ. रामपाटील रातोळीकर, मा. आ. प्रताप पाटील चिखलिकर, आ. तुषार राठोड, विरोधी पक्ष नेता सौ. गुरूप्रितकौर सोडी, राजेश्वर दुडूकनाळे, विश्वाभर भरकड, धारोजी हंबर्डे, संस्थेचे संचालक तथा सचिव डॉ. संतुकराव हंबर्डे, हे उपस्थित होते.

यावेळी स्वागतपर मनोगत व्यक्त करताना म्हणालेकी आमच्या नावतच सहयोग आसल्याने आम्ही विद्यापीठालाच नव्हे तर सर्वानाच सहयोगाची भुमीका आसते त्याच बरोबर आमदार रामपाटील रातोळीकर यानी तरूणाच्या कलागुणाना वावदेन्याचे काम प्रथम शाहु महाराज यानी केले होते त्याचा वसा आपन पुढे चालु ठेवावा तर प्रताप पाटील चिखलीकर यानी ही आपल्या मंनोगतात सांगताना म्हणाले की आजच्या तरुणाईत कलागुणाचे तारूण्य सळसळताना दिसत नाही. या आगोदर विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. राजेशवर दुडुक्नाळे यानी यिवकाना प्रोहत्सान व त्याच्या अंगातील कलागुणाना वळन देन्यासाठी महाविद्यालयातुन ही कला जपाली जाते आसे सांगीतले. यांबरोबरच इतर मान्यावरानी ही आपले मनोगत व्यक्त केले. तर विजय पवार यानी युवक महोत्सवास शुभेच्छा दिल्या या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन देशमुख यानी केले तर आभारप्रदर्शन प्राचार्य वश्वनाथ भरकड यानी केले.

आनंद नगरी मंगळवार, २५ सप्टेंबर २०१८ 3

# स्वारातीम विद्यापीठाच्या युवक महोत्सवास थाटात प्रारंभ

नांदेड / प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव 'सहयोग-२०१८' विष्णुपुरी येथील सहयोग कॅम्पसमध्ये सोमवारी (दि. २४) मान्यवरांच्या हस्ते उद्घाटनाने सुरू झाला.

उद्घाटकीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे हंगामी कुलगुरू डॉ. दिलीप म्हैसेकर होते. यावेळी मंचावर आ. राम पाटील रातोळीकर, आ. प्रताप पाटील चिखलीकर, आ. डॉ. तुषार राठोड, सुप्रसिद्ध मराठी पार्श्वगायक मंगेश बोरगावकर आणि स्वागताध्यक्ष तथा सहयोग सेवाभावी संस्थेचे सचिव डॉ. संतुकराव हंबर्डे, प्राचार्य डॉ. विजय पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य परमेश्वर हसबे, डॉ. दीपक बच्चेवार, डॉ. अशोक टिप्परसे, डॉ. वैजयंता पाटील, डॉ. महेश मगर, कुलसचिव डॉ. रमजान मुलानी, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. रवी सरोदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजेश्वर दुडूकनाळे, इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य विश्वनाथ भरकड यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. दिलीप म्हैसेकर म्हणाले की, आजची पिढी टेक्नोसॅव्ही असली तरी या तंत्रज्ञानाच्या आहारी जात आहे. रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत ज्यांचे वय १८ ते २४ आहे, असे ६७ टक्के विद्यार्थी मोबाईल, कॉम्प्युटर, टॅबवर व्यस्त राहत आहेत. ही बाब विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी व देशाच्या विकासासाठी घातक आहे. तंत्रज्ञानाची व्यसनाधिनता विद्यार्थ्यांना मैदानी खेळापासून वंचित ठेवत आहे. सांस्कृतिक चळवळ तेवत ठेवण्यासाठी युवक महोत्सव महत्त्वाची भूमिका बजावतात. या महोत्वसातून चांगले कलावंत निर्माण व्हावेत, असा आशावाद डॉ. म्हैसेकर यांनी व्यक्त केला. उपस्थित विद्यार्थ्यांना त्यांनी प्रथेप्रमाणे युवक महोत्सव चांगल्या रीतीने पार पाडण्याची प्रतिज्ञा दिली.

आ. प्रताप पाटील चिखलीकर म्हणाले की, आपले नांदेड कुठल्याही स्पर्धेसाठी कमी नाही. आयएएस सारख्या परीक्षेमध्ये एकाच वर्षी नांदेड जिल्ह्यातील पाच विद्यार्थी झळकले. तसेच या युवक महोत्सवामध्येही नांदेड विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी देशपातळीवर आपल्या विद्यापीठाचे नाव करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. आ. राम पाटील रातोळीकर, प्राचार्य डॉ. विजय पवार यांनीही शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. स्वागताध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे यांनी कार्यक्रमाची भूमिका स्पष्ट केली. २४ ते २७ चार दिवस चालणाऱ्या आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवात विविध लोककलांचे सादरीकरण होणार आहे. विद्यार्थी कलावंतांनी खिलाडूवृत्तीने सादरीकरण करावे व महोत्सवाचा आनंद घ्यावा, असे आवाहन



...त्कार बाकी आहे
कुठे हरवेल हे सांगत
महत्त्व वाढू शकेल,
जर या दोन पक्षांच्या
कळणार नाही. दलित
विचार करता मायावत
पक्षांमागून फरफटत ज
येईल, याची त्यांना ख
देता आपला हत्ती डौ


हे दैनिक श्री अंबिका प्रि
मुरलीधर शिंगोटे यांनी श्र
ॲडिशनल लातूर इंडस्ट्रि
कोसबटवार कॉम्प्लेक्स,
प्रकाशित केले. संस्थापक
भिडे, संपादक : श्री. अरवि
(*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय ज
यामधून व्यक्त झालेल्या
■ R.N.I. No. MAHMA
२६७५६६. नांदेड कार्याल

# युवक महोत्सव उद्घाटनात तरुणाईचा उत्साह



छाया-करणसिंह बैस

नवीन नांदेड, दि.२४ : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि सहयोग सेवाभावी संस्थेचे इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहयोग-२०१८' आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवामध्ये भारतरत्न डॉ. अटल बिहारी वाजपेयी मंचावर दुपारी पोवाडा या लोककला प्रकाराला सुरुवात झाली. या स्पर्धेत भाग घेणारे महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींची संख्या उल्लेखनीय होती. यातून त्यांनी राष्ट्रमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यांच्यासह स्त्रीमुक्ती, स्त्रीभ्रूण हत्या आणि दहशतवाद आदीवर पोवाड्याच्या माध्यमातून जनजागृती केली.

लातूरच्या जयक्रांती महाविद्यालयाच्या शिरीष बेंबडे या विद्यार्थी कलावंताने दहशतवादाचा पोवाडा साजर केला. त्याला साथ अंकुश, कृष्ण, सुरेश, प्रशांत आणि बालाजी पवार यांनी देऊन सादरीकरण केले. महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूरच्या ऐश्वर्या पांचाळ हीने राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जीवन चरित्रावर पोवाडा सादर केला.

लातूरच्या महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाच्या प्रगती गवळीने अटलजींची यांच्या संघर्षगाथेवर पोवाडा सादर करून भारतरत्न अटलजी यांच्या कार्याचा गौरव केला. दयानंद वाणिज्य ,महाविद्यालय लातूरच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य गाथेवर पोवाड्याचे सादरीकरण प्रेक्षकांची दाद मिळवली. पीपल्स महाविद्यालयाच्या शेख अल्लाउद्दीन यांनी महात्मा फुले यांच्या क्रांती गाथा पोवाड्यातून सादर केल्या. एमजीएम आय.टी. महाविद्यालयाच्या अक्षय वांगणकर याने छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्य गाथेतून संभाजी महाराजांचे चरित्र प्रेक्षकांसमोर ठेऊन प्रेक्षकांचा वन्स मोअर मिळविला. या सादरीकारांमध्ये साक्षी काळे, प्रगती शिंदे, शुभम कुलकर्णी, गौतम कांबळे, अब्दुल डायम यांनी साथ दिली.

# युवक महोत्सवात आज लावणी व जलशाचे आयोजन



प्रतिनिधी / २४ सप्टेंबर

**नांदेड :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव विद्यापीठ आणि सहयोग सेवाभावी संस्थेचे इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी, विष्णुपुरी यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या युवक महोत्सवात २५ सप्टेंबर रोजी लावणी व जलशाचे आयोजन करण्यात आले आहे.

२५ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता लावणी, दुपारी २ वा. जलसा तसेच २६ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता लोकसंगीत, सकाळी १० वाजता लोकनृत्य, आदिवासी नृत्य या कलाप्रकारांचे सादरीकरण होणार आहे. २५ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता विडंबन (स्कीट), दुपारी २ वाजता एकांकीका, २६ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता शास्त्रीय नृत्य, दुपारी १२ वाजता नक्कल या कलाप्रकारांचे सादरीकरण होणार आहे. २५ रोजी सकाळी ८ वाजता शास्त्रीय तालवाद्य, दुपारी २ वा. शास्त्रीय सुरवाद्य, सायंकाळी ५ वा. शास्त्रीय गायन, २६ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता समुहगायन (भारतीय), दुपारी ४ वाजता समुहगायन (पाश्चात्त्य) या कलाप्रकारांचे सादरीकरण होणार आहे. २५ रोजी सकाळी ८ वाजता 'भारताची शेतीविषयक धोरणे, शेती आणि शेतकरी हिताची आहेत किंवा नाहीत?' विषयावर वादविवाद स्पर्धा पार पडणार आहेत. सकाळी ८ वा. स्थळछायाचित्रण, सकाळी ११ वा. रांगोळी, दुपारी ३ वा. पोस्टर मेकींग, २६ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वा. कोलाज, सकाळी ११ वा. चित्रकला, दुपारी २ वा. मृदमूर्ती यास्पर्धा पार पडणार आहेत. स्पर्धक व प्रशिक्षक, व्यवस्थापक यांना उत्कृष्ट सुविधा देण्यासाठी इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसीने नोंदणी समिती, स्वागत समिती, स्थानिक संयोजन समिती, स्टेज समिती, पाणी व विद्युत व्यवस्था समिती, निवास व्यवस्था समिती, प्रसिध्दी समिती, शिस्तपालन समिती, वाहतूक व्यवस्था समिती, सांस्कृतिक समिती, तक्रार निवारण समिती आदी समित्यांचे गठन केले असून विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजेश्वर दुडूकनाळे, इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य विश्वनाथ भरकड, 'सहयोग-२०१८' युवक महोत्सवाचे सचिव प्रा.प्रविण मुळी, प्राचार्य डॉ.बालाजी गिरगावकर यांच्यासह विद्यार्थी विकास मंडळ आणि युवक महोत्सव सल्लागार समिती सदस्य युवक महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेत आहेत.

देशोन्नती मंगळवार, दि .२५ सप्टेंबर २०१८
epaper.deshonnati.com
५

# युवक महोत्सवाचे थाटात उद्घाटन

## 'स्वारातीम-सहयोग-२०१८' ला उत्साहात सुरवात; विद्यार्थ्यांमध्ये आनंद

**नवीन नांदेड, ता. २४ (बातमीदार) :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि सहयोग सेवाभावी संस्थाचे इंदिरा फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने विष्णुपुरी, नांदेड येथे आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव 'सहयोग-२०१८' चे सोमवारी (ता. २४) भारतरत्न डॉ. अटल बिहारी वाजपेयी मुख्यमंच्यावर थाटात उद्घाटन झाले.



नवीन नांदेड : युवक-महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी कुलगुरू डॉ. दिलीप म्हैसेकर, आमदार राम पाटील रातोळीकर, प्रताप पाटील चिखलीकर, डॉ.तुषार राठोड, स्वागताध्यक्ष डॉ. संतुक हंबर्डे व अन्य.

या वेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप म्हैसेकर, विधान परिषद सदस्य आमदार राम पाटील रातोळीकर, लोहा-कंधार विधानसभेचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर, मुखेड विधानसभेचे आमदार डॉ. तुषार राठोड, पार्श्वगायक मंगेश बोरगावकर, कुलसचिव डॉ. रमजान मुलाणी, परीक्षा व मूल्यमापन संचालक डॉ. रवी सरोदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजेश्वर दुडूकनाळे, प्राचार्य विजय पवार आणि स्वागताध्यक्ष तथा सहयोग सेवाभावी संस्थेचे सचिव डॉ. संतुकराव हंबर्डे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. या वेळी कुलगुरु डॉ. दिलीप म्हैसेकर यांनी आजच्या काळात लोककला लुप्त होत चालली की काय? ज्याप्रमाणात ते दिसायला हवी ती दिसत नाही.

युवक महोत्सव हा लोककलेचा जागर व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली. आमदार प्रताप पाटील म्हणाले की "अशा प्रकारचे महोत्सव साजरे करण्यासाठी अनेक महाविद्यालयांनी पुढाकार घेतला पाहिजे." आमदार रातोळीकर, प्राचार्य विजय पवार आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. पार्श्वगायक मनोज बोरगावकर यांनी आपल्या गाण्यातून उपस्थितांची दाद मिळविली.

सकाळ
मंगळवार, २५ सप्टेंबर २०१८ | ६

# महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचे युवक महोत्सवातून जतन व्हावे

## कुलगुरु डॉ. दिलीप म्हैसेकर यांचे तरुणाईला आवाहन



*प्रतिनिधी/* २४ सप्टेंबर

**नांदेड :** आजघडीला जेंव्हा जेंव्हा सांस्कृतीक कार्यक्रमांचा विषय पुढे येतो, तेंव्हा तेंव्हा तरुणाई डीस्को आणि डान्समध्येच गुरफटल्याचे स्पष्ट होते. हे चित्र पाहील्यानंतर महाराष्ट्राची लोकसंस्कृती लोपपावत चालली आहे, अशी शंकाही उत्पन्न होते. त्यामुळे युवक महोत्सवाच्या माध्यमातुन तरुणाईने महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचे जतन करावे, असे आवाहन स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. दिलीप म्हैसेकर यांनी येथे सोमवारी केले.

स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ व सहयोग सेवाभावी संस्थेचे इंदिरा कॉलेज ऑफ फॉर्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत 'सहयोग २०१८' युवक महोत्सवाचे उद्‌घाटन कुलगुरु डॉ. दिलीप म्हैसेकर यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी पार पडले. त्यावेळी डॉ. म्हैसेकर बोलत होते. या उद्‌घाटन सोहळयाला आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, आ. राम पाटील रातोळीकर, आ. डॉ. तुषार राठोड, युवक महोत्सवाचे स्वागताध्यक्ष संतुक हंबर्डे यांची प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थिती होती.

पुढे बोलतांना डॉ. म्हैसेकर म्हणाले, आजची पिढी नवनविन तंत्रज्ञानाच्या व्यसनाधिनतेत डुंबत चालली आहे. रात्री १० ते सकाळी ६ या वेळेत ६७ टक्के मुले व ६३ टक्के मुली मोबाईल सोबत 'अटॅच' होत असल्याची चिंताजनक बाब एका जागतीक दर्जाच्या सर्व्हेक्षणातुन पुढे आली आहे. भारत हे राष्ट्र तरुणांचे राष्ट्र म्हणुन ओळखले जाते. तरुणांनी आपले ध्येय साध्य करतांना आपल्या संस्कृतीचेही जतन करणे आवश्यक आहे. महाराष्ट्राची लोपपावत चाललेली लोकसंस्कृती जतन करण्याचे काम याच तरुणाईने युवक महोत्सवाच्या माध्यमातून केले पाहिजे, असेही डॉ. म्हैसेकर यावेळी म्हणाले.

➢ उर्वरित वृत्त / लाईव्ह ८ वर..

### भाजप सरकार विद्यार्थी हिताचे निर्णय घेतेय-आ. रातोळीकर

जागतीक पातळीवर युवकांचा देश म्हणुन भारताकडे पाहिले जाते. या युवकांचे, विद्यार्थ्यांचे भवितव्य अधिकाधिक उज्वल घडविता यावे, यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सातत्याने योजना राबवित आहेत. गोर-गरिब विद्यार्थ्यांच्या शिक्षणात येणारा आर्थिक स्वरुपाचा अडसर दूर करण्यासाठी शिष्यवृत्ती वाढ, वस्तीगृहांची संख्या वाढविणे व नौकरीची वयोमर्यादा वाढवून देण्याचे काम या सरकारने केले असल्याची माहिती आ. राम पाटील रातोळीकर यांनी आपल्या मनोगतातून उपस्थितांना दिली.

### आज मंगळवार २५ सप्टेंबरचे कार्यक्रम

**भारतरत्न डॉ. अटल बिहारी वाजपेयी सभामंडप (खुले) (मंच क्र.-१)**
सकाळी ८.०० वाजता लावणी, दुपारी २.०० वाजता जलसा

**विजय चव्हाण - नाट्य विभाग (मंच क्र.-२)**
सकाळी ८.०० वाजता विडंबन(स्कीट), दुपारी २.०० वाजता एकांकीका

**किशोरी आमोणकर कलामंच - संगीत विभाग (मंच क्र.-३)**
सकाळी ८.०० वाजता शास्त्रीय तालवाद्य, दुपारी २.०० वाजता शास्त्रीय सुरवाद्य, सायंकाळी ५.०० वाजता शास्त्रीय गायन

**विंदा करंदीकर मंच - वाङ्मय विभाग (मंच क्र.-४)**
सकाळी ८.०० वाजता 'भारताची शेतीविषयक धोरणे, शेती आणि शेतकरी हिताची आहेत/नाहीत?' विषयावर वादविवाद स्पर्धा

**वासुदेव गायतोंडे मंच - ललित कला विभाग (मंच क्र.-५)**
सकाळी ८.०० वाजता स्थळछायाचित्रण,
सकाळी ११.०० वाजता रांगोळी, दुपारी ३.०० वाजता पोस्टर मेकींग यास्पर्धा

### नांदेड जिल्ह्यातील विद्यार्थी सर्वच क्षेत्रात अग्रेसर- आ. चिखलीकर

युवक महोत्सवाच्या माध्यमातून तरुणाईला आपली अंगभूत कला सादर करुन लौकिक मिळविण्याची संधी उपलब्ध होते. स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील अनेक विद्यार्थ्यांनी याच माध्यमातून आपली ओळख निर्माण केल्यानंतर आता वेगवेगळया कला क्षेत्रामध्ये लौकिक संपादन केला आहे. केवळ कला गुणांमध्येच नव्हे तर स्पर्धात्मक परिक्षांमध्ये देखिल नांदेड जिल्हा कुठेही कमी नाही. याच वर्षी जिल्ह्यातील तब्बल पाच विद्यार्थी आयएएसची परिक्षा उत्तीर्ण झाले आहेत. यावरुनच नांदेड जिल्ह्यातील विद्यार्थी सर्वच क्षेत्रामध्ये अग्रेसर असल्याचे नमूद करुन आ. प्रतापराव पाटील चिखलीकर युवक महोत्सवात सहभागी विद्यार्थ्यांमध्ये उर्जा निर्माण केली.

देशोन्नती 3
मंगळवार, दि. २५ सप्टेंबर २०१८

# स्वारातीम विद्यापीठ युवक महोत्सव सह्योग-२०१८ चे थाटात उद्घाटन





नवीन नांदेड-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव विद्यापीठ आणि विष्णुपुरी, नांदेड येथील सहयोग सेवाभावी संस्थेचे इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहयोग-२०१८' विद्यापीठ युवक महोत्सवाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते सोमवार, दि.२४ सप्टेंबर रोजी सहयोग एज्यूकेशनल कॅम्पसमध्ये थाटात झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप म्हैसेकर हे होते. यावेळी व्यासपीठावर आ. राम पाटील रातोळीकर, आ. प्रताप पाटील चिखलीकर, आ. डॉ. तुषार राठोड, सुप्रसिध्द मराठी पार्श्वगायक मंगेश बोरगावकर आणि स्वागताध्यक्ष तथा सहयोग सेवाभावी संस्थेचे सचिव डॉ. संतुकराव हंबर्डे, ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य परमेश्वर हसबे, डॉ. दीपक बच्चेवार, डॉ.अशोक टिप्परसे, डॉ. वैजयंता पाटील, डॉ.महेश मगर, कुलसचिव डॉ. रमजान मुलानी, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. रवि सरोदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजेश्वर दुडूकनाळे, इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य विश्वनाथ भरकड यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप म्हैसेकर आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात म्हणाले, आजची पिढी नवनवीन तंत्रज्ञानाची व्यसनाधीन होत आहे. रात्री १० ते सकाळी ६ पर्यंत ६७ टक्के विद्यार्थी ज्यांचे वय १८ ते २४ आहे असे मोबाईल, कॉम्प्युटर, टॅब यावर व्यस्त राहत आहेत. ही विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी व देशाच्या विकासासाठी घातक अशी बाब आहे. मैदानी खेळ कमी होतात. लोककला जोपासण्यासाठी या युवक महोत्सवाच्या माध्यमातून आपण सर्वांना एकत्र येऊन प्रयत्न केले पाहिजे. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना त्यांनी प्रथेप्रमाणे युवक महोत्सव चांगल्या रीतीने पार पाडण्याची प्रतिज्ञा दिली. आ.प्रताप पाटील चिखलीकर यांनी आपले शुभेच्छापर मनोगत व्यक्त करतांना म्हणाले, आपले नांदेड कुठल्याही स्पर्धेसाठी कमी नाही. आयएएस सारख्या परीक्षेमध्ये एकाच वर्षी नांदेड जिल्ह्यातील पाच विद्यार्थी झळकले. तसेच या युवक महोत्सवामध्येही नांदेड विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी देश पातळीवर आपल्या विद्यापीठचे नाव करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. आ. राम पाटील रातोळीकर, प्राचार्य डॉ.विजय पवार यांनीही शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. सहयोग सेवाभावी संस्थेचे सचिव तथा स्वागताध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे यांनी आपले स्वागतपर मनोगत व्यक्त करतांना म्हणाले; चांगल्या कामासाठी नेहमी आम्ही सहयोग देण्यास तयार आहोत. भारतरत्न डॉ.अब्दुल कलाम यांच्या स्वप्नातील भारत तुम्ही युवकच पूर्ण करू शकता. त्यासाठी अभ्यास करा, कला जोपासा आणि हे करतांना आई-वडिलांचे मनही जपा, असे आवाहनही यावेळी त्यांनी केले.

सुप्रसिध्द मराठी पार्श्वगायक मंगेश बोरगावकर यांनी काही गीते सादर करून तरुणाईशी संवाद साधला. 'अगं बाई अरेच्या....' या मराठी चित्रपटातील 'मन उधाण वाऱ्याचे...... गुज पावसाचे .....' हे गीत सादर करून तरुणाईला थिरकवले. सहयोग-२०१८ विद्यापीठ युवक महोत्सवाची सुरवात सकाळी ९. ०० वाजता विद्यापीठ ध्वजारोहण, राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने करून मानवी कौशल्ये : पारंपरिकतेकडून आधुनिकतेकडे या विषयावरील शोभायात्रेला व्यवस्थापन परिषद सदस्य परमेश्वर हसबे यांनी हिरवी झेंडी दाखवून सुरुवात केली. यावेळी आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देणारे फलक महात्मा गांधी मिशन अभियांत्रीकी महाविद्यालयाने सादरीकरण केले. ग्रामीण कॉलेज इंजिनिअरींग, विष्णुपुरी यांनी स्त्री कर्तुत्वाची झेप; तिमिरातुन तेजाकडे यातील थोर विचारवंत स्त्रीयाचे देखावे सादर करुन सावित्रीबाई फुले ते मलाला युसुफझाई या अधिनिक कर्तुत्वान स्त्रीयाचे देखावे सादर केले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजेश्वर दुडूकनाळे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. विश्वाधार देशमुख यांनी केले तर इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य विश्वनाथ भरकड यांनी आभार मानले.

# स्वारातीम विद्यापीठ युवक महोत्सव 'सह्योग-२०१८'चे उद्घाटन थाटात संपन्न



नांदेड - स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव विद्यापीठ आणि विष्णुपुरी, नांदेड येथील सहयोग सेवाभावी संस्थेचे इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहयोग-२०१८' विद्यापीठ युवक महोत्सवाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते आज सोमवार, दि.२४ सप्टेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता सहयोग एज्यूकेशनल कॅम्पसमध्ये संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप म्हैसेकर हे होते. यावेळी त्यांच्यासमवेत व्यासपीठावर आ. राम पाटील रातोळीकर, आ.प्रताप पाटील चिखलीकर, आ. डॉ. तुषार राठोड, सुप्रसिध्द मराठी पार्श्वगायक मंगेश बोरगावकर आणि स्वागताध्यक्ष तथा सहयोग सेवाभावी संस्थेचे सचिव डॉ.संतुकराव हंबर्डे, ग्रामीण आभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य परमेश्वर हसबे, डॉ. दीपक बच्चेवार, डॉ.अशोक टिप्परसे, डॉ.वैजयंता पाटील, डॉ.महेश मगर, कुलसचिव डॉ. रमजान मुलानी, परिक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. रवि सरोदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजेश्वर दुडूकनाळे, इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य विश्वनाथ भरकड यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीपजी म्हैसेकर आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात म्हणाले, आजची पिढी नवनवीन तंत्रज्ञानाची व्यसनाधीन होत आहे. रात्री १० ते सकाळी ६ पर्यंत ६७ टक्के विद्यार्थी ज्यांचे वय १८ ते २४ आहे असे मोबाईल, कॉम्प्युटर, टॅब यावर व्यस्त राहत आहेत. ही विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी व देशाच्या विकासासाठी घातक अशी बाब आहे. मैदानी खेळ कमी होतात. लोककला जोपासण्यासाठी या युवक महोत्सवाच्या माध्यमातून आपण सर्वांना एकत्र येऊन प्रयत्न केले

पान ४ वर ≻≻

४ दैनिक वाचकमंच
मंगळवार दि. २५ सप्टेंबर २०१८

## स्वारातीम विद्यापीठ युवक महोत्सव....

पाहिजे. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना त्यांनी प्रथेप्रमाणे युवक महोत्सव चांगल्या रीतीने पार पाडण्याची प्रतिज्ञा दिली. आ.प्रताप पाटील चिखलीकर यांनी आपले शुभेच्छापर मनोगत व्यक्त करतांना म्हणाले, आपले नांदेड कुठल्याही स्पर्धेसाठी कमी नाही. आयएएस सारख्या परीक्षेमध्ये एकाच वर्षी नांदेड जिल्ह्यातील पाच विद्यार्थी झळकले. तसेच या युवक महोत्सवामध्येही नांदेड विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी देश पातळीवर आपल्या विद्यापीठचे नाव करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. आ. राम पाटील रातोळीकर, प्राचार्य डॉ.विजय पवार यांनीही शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. सहयोग सेवाभावी संस्थेचे सचिव तथा स्वागताध्यक्ष डॉ.संतुकराव हंबर्डे यांनी आपले स्वागतपर मनोगत व्यक्त करतांना म्हणाले, चांगल्या कामासाठी नेहमी आम्ही सहयोग देण्यास ... आहोत. भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम यांच्या स्वप्नातील

# Youth should come forward to sustain folk arts: VC Mhaisekar



MLC Ram Patil Ratolikar lights the traditional lamp at the inauguration of the Sahyog 2018, an Intercollegiate Youth festival at Indira Pharmacy College at Vishnupuri, in Nanded on Sunday. SRTMU vice chancellor Dr Dilip Mhaisekar, MLA Pratap Patil Chikhalikar, MLA Dr Tushar Rathod, Santujraoji Hambarde, Student Welfare director Dhuduknale are also seen.

LOKMAT NEWS NETWORK
NANDED, SEPT 24

"Excessive advancement and use of technology is diminishing the forkarts in Maharashtra. Students should come forward to rejuvenate and sustain folk arts in order to save our rich culture from diminishing," observed Dr Dilip Mhaisekar, the in-charge vice chancellor of the Swami Ramanand Teerth Marathwada Universtiy.

He was speaking at the inauguration ceremony of the four-day Intercollegiate Youth Festival Sahyog-2018, jointly organised by the SRTM University and Indira Pharmacy College, at Vishnupuri in Nanded.

The vice chancellor furthur expressed concern over cell phone addiction among the young generation. He said, according to the British study, about 67 per cent boys and 33 per cent girls use cell phones up to 10 pm. Santukrao Hambarde in his speech made an earnest appeal to the students to create their own identity through hard work as birth and death are not in our hands. He also urged the students to propagate the Sachha Bharat mission.

MLC Ram Patil Ratolikar advised the students to become big through big deeds. MLA Pratap Patil Chikhalikar appreciated the Sahyog management for hosting the Youth Fest for the 4th time but he also expressed a concern over the colleges which are reluctant to host the youth festival.

Noted playback singer Mangesh Borgaonkar impressed the gathering with his songs 'odh lavati jeevala ashi, gavakadchi maati', 'man udhaan vaaryache, among others.

MLA Pratap Patil Chikhalikar, MLA Dr Tushar Rathod, MLC Ram Patil Ratolikar, playback singer Mahesh Borgaonkar, organizer and BJP Nanded city chief Santukraoji Hambarde, Dharoji Hambarde, Vijaykumar Pawar, SRTMU Registrar Dr Ramjan Mulani, BOEE Dr Sarwade, Management council members Parmeshwar Hasbe, Dr Deepak Bacchewar, Dr Ashok Tipperse, Mahesh Magar Dr Vaijanta Patil, Student development department director Dr Rajeshwar Dhuduknale were on the dais.

SRTMU PRO Dr Ashok Kadam, NSS Coordinator of SRTMU Dr Pawar, Sport Director Vithhalsinh Parihar and many students, teachers, artists judges, reporters were present. Sambhaji Kamble, Sunil Kamble, Govindrao Hambarde of the student development made efforts. Dr Vishvadhar Deshmukh conducted the proceedings while principal of the host college Dr Vishvanath Bharkad proposed a vote of thanks.

Lokmat Times TUESDAY | 25 SEPTEMBER 2018
AURANGABAD

# युवक महोत्सवात दुसऱ्या दिवशीही धमाल

नवीन नांदेड : दिगंबर शिंदे

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि सहयोग सेवाभावी संस्थेचे इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहयोग-२०१८' आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवाला सुरूवात झाली असून मंगळवारी दुसऱ्या दिवशी विविध पाच रंगमंचावर सहभागी कलावंतांनी कलेचे सादरीकरण केले.

भारतरत्न डॉ. वाजपेयी मंचावर दुपारी पोवाडा या लोककला प्रकाराला सुरुवात झाली. या स्पर्धेत भाग घेणाऱ्या महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींची संख्या उल्लेखनीय होती. यावेळी राष्ट्रमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह स्त्रीमुक्ती, स्त्रीभ्रूण हत्या आणि दहशतवाद आदीवर पोवाड्याच्या माध्यमातून जनजागृती केली.

दरम्यान लातूरच्या जयक्रांती महाविद्यालयाच्या शिरीष बेंबडे या विद्यार्थी कलावंताने दहशतवादावर आधारित पोवाडा सादर केला. त्याला साथ अंकुश, कृष्ण, सुरेश, प्रशांत आणि बालाजी पवार यांनी देऊन सादरीकरण केले.

तसेच महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूरच्या ऐश्वर्या पांचाळ हिने राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जीवन चरित्रावर पोवाडा सादर केला. लातूरच्या महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाच्या प्रगती गवळीने अटलजींची यांच्या संघर्ष गाथेवर पोवाडा सादर करून भारतरत्न अटलजी यांच्या कार्याचा गौरव केला. तसेच दयानंद वाणिज्य ,महाविद्यालय लातूरच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य गाथेवरील पोवाड्याच्या सादरीकरणास प्रेक्षकांची दाद मिळवली. तर पीपल्स महाविद्यालयाच्या शेख अल्लाउद्दीन यांनी महात्मा फुले यांच्या क्रांती गाथा पोवाड्यातून सादर केल्या. एमजीएम आय.टी. महाविद्यालयाच्या अक्षय वांगणकर याने छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्य गाथेतून संभाजी महाराजांचे चरित्र प्रेक्षकांसमोर ठेऊन प्रेक्षकांचे वन्स मोर मिळविला. या सादरीकारांमध्ये साक्षी काळे, प्रगती शिंदे, शुभम कुलकर्णी, गौतम कांबळे, अब्दुल डायम साथ दिली.

दरम्यान विजय चव्हाण नाट्यमंचावर मूक अभिनयातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या, समाजातील जीवंत प्रश्नावर मूक अभिनयाचे सादरीकरण केले. यामध्ये ३३ महाविद्यालयाच्या संघाच्या कलाकारांनी सहभाग घेतला होता. तसेच किशोरी आमोणकर कलामंचावर भारतीय सुगम गायन या कलाप्रकारांत ४३ महाविद्यालयाच्या कलाकारांनी सहभाग नोंदवून या कलेचे सादरीकरण सुरु होते.

तर वि.दा. करंदीकर मंचावर आनंदी जीवनाची अनोखीरित: साहित्य गीत संगीत या विषयावर दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या विधी पळसपुरे जनआंदोलने दशा आणि दिशा य विषयवर राजर्षी शाहू महाविद्यालयाच्य कृष्णा काटवटे विद्यार्थी कलाकारांनी आपले विचार मांडतांना आजची देशातील परिस्थिती साहित्यातील विविध साहित्य लेखन जुन्या व नवीन गीतांचा छंद आणि संगीत हे आपल्या जीवनात किती रुजले आहेत, याविषयी आपल्या वक्तृत्त्वातून माहिती दिली.

तसेच वासुदेव गायतोंडे मंचावर कलात्मक जुळवणी आणि व्यंगचित्रकला हा कलाप्रकार घेण्यात आला. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजेश्वर दुडूकनाळे, इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य विश्वनाथ भरकड, सहयोग-२०१८ युवक महोत्सवाचे सचिव प्रा.प्रविण मुळी, प्राचार्य डॉ.बालाजी गिरगावकर यांच्यासह विद्यार्थी विकास मंडळ आणि युवक महोत्सव सल्लागार समिती सदस्य युवक महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेत आहेत.

## पोवाड्यातुन इतिहासातील आठवणींना दिला उजाळा

येथे दुपारी दोन वाजता सहभागी कलावंतांनी पोवाडा कला प्रकार सादर केला. ज्यातून क्रांतिकारक महापुरुषांच्या विचार पोवड्यातुन रसिकांसमोर आला. दयानंद विधी महाविद्यालय, लातूर च्या संघाने छत्रपती शिवराय यांचा जाज्वल्य इतिहास सर्वा समोर ठेवला. श्री. गुरु गोविंदसिंघजी पत्रकारिता महाविद्यालय, नांदेड च्या संघाचे संघ व्यवस्थापक प्रा. अमोल धुळे, श्वेता खानजोडे, श्रावण वाहुळकर यांच्या नेतृत्वाखाली पोवाडा सादर करून टाळ्या मिळविल्या.

- दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर यांनी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या वरील सुंदर पोवाडा सादर करीत मुंबई ते जगभरातील विविध प्रकारच्या घटनांचा आढावा तसेच क्रांतिकारी घेतलेला निर्णय याविषयी शाहीर मारोती आंबेटवाड समवेत योगेश उगळे, दत्ताहरी सोळंके, संभाजी इंगळे, बालाजी सुर्यवंशी, अंकुश डाखोरे, यांनी साथ दिली. ढोलकीवर अंकुश डाखोरे यांनी स्वर चढविला. संघव्यवस्थापक प्रा. एस. पी. थोरात, डॉ. संजय काळे, डॉ. एस. एस. पवार यांनी परीश्रम घेतले.
- महात्मा गांधी मिशने आय. टी. कॉलेज, नांदेडच्या सहभागी स्पर्धकांनी छात्रवीर संभाजी महाराज यांचा दैदिप्यमान इतिहास मांडला. यात कलावंत अक्षय येगावकर, शुभम कुलकर्णी, गौतम कांबळे, साक्षी काळे, प्रगती शिंदे, अब्दुल दायम यांनी इतिहास जाग्रत केला. संभाजी महाराज यांना बदानाम करण्याचा घाट घातला. मात्र संभाजी महाराज यांनी त्यांच्या काळात एकही लढाई न हारणारा, अनेकविध भाषांमध्ये साहित्य निर्माण करणारे राजा म्हणून इतिहासात नोंद असणारा हा राजा म्हणचेच दुसरा छत्रपती संभाजी महाराज यांना समाजासमोर घेत आजच्या युगात युवकांनी शंभूराजे यांचा आदर्श घ्यावा असा संदेश आपल्या पोवाड्याच्या माध्यमातून सादर केला. या पोवाड्याला प्रा. गंगाधर बिल्लाळीकर, प्रा. परमानंद जाधव पाटील, प्रा. चंद्रकांत घोडसे यांनी साथ दिली. सायन्स महाविद्यालय, नांदेड यांनी सुध्दा पोवाड्याच्या रांगड्या कलाप्रकारातून आपली कला सादर केली. यात विद्यार्थी कलावंत विशाल पाटील, राहुल भगत, रूषीकेश सकरगे, वैभव कोल्हे, ओमप्रकाश नरवटे तर साथसंगत देताना ढोलकी शेख जावेद, हार्मोनियम सुनील लांबटीळे, रिदम संतोष देशमुख यांनी भुमिका बजावली.

## आजचे कार्यक्रम

मंच क्रं. १ – लोकसंगीत, लोकनृत्य, आदिवासी नृत्य
मंच क्रं. २ – शास्त्रीय नृत्य, नक्कल
मंच क्रं. ३ – समुह गायन (भारतीय), (पाश्चात्य)
मंच क्रं. ४ काही नाही
मंच क्रं. कोलाज, चित्रकला, मृदमुर्तीकला आदी कार्यक्रम होणार आहेत.

# युवक महोत्सवामध्ये रांगोळी स्पर्धा

नवीन नांदेड(प्रतिनिधी)- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने चालू असलेल्या 'सहयोग-' आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवामध्ये वासुदेव गायतोंडे ललित कला मंचावर रांगोळी या स्पर्धा घेण्यात आल्या.

यामध्ये बावन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. यास्पर्धेमध्ये अनेक विद्यार्थ्यांनी पारंपरिक रांगोळी, नैसर्गिक चित्रावर कलात्मक रांगोळी काढून अनेकांचे लक्ष वेधून घेतले. विद्यार्थ्यांनी काढलेल्या रांगोळी पाहून अनेकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक तर केलेच परंतु यामुळे रांगोळी या कलेस नवीन आयाम देण्याचा प्रयत्न देखील या विदयार्थ्यांनी केलेला दिसला.

आनंद नगरी
बुधवार, २६ सप्टेंबर २०१८

# झोंबतोय गारवा... यावर तरुणाई थिरकली



**नांदेड :** सहयोग-२०१८' आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवात दुसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात लावणी हा कलाप्रकार भारतरत्न डॉ. अटलबिहारी वाजपेयी कला मंचावर सुरू झाला. साधारणतः लावणी हा कलाप्रकार सायंकाळच्या वेळी सादर केला जातो, परंतु स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने नवीन पायंडा पाडत लावणी सकाळच्या सत्रात घेण्यास मागील वर्षांपासून सुरुवात केली. या बदलास प्रेक्षक, कलावंतांनी उत्स्फुर्त प्रतिसाद देत मनमुराद आनंद लुटला. ह्या लावणी सोहळ्याने सहयोग एज्यूकेशनल कॅम्पसच्या परिसरात तरुणाई ढोलकीच्या ठेक्यावर थिरकताना दिसली.

राया मला सोडून जाऊ नका हि लावणी नांदेडच्या एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या गणेश काकडेने सादर केली. आकांक्षा मोतेवार या विद्यार्थिनीने ढोलकीच्या तालावर गुणगाराच्या बोलावर ... मी नाचते मी डोलते एस्काच्या दरबारात हि लावणी सादर केली. त्या नंतर रेशमाच्या रेघांनी लाल काळ्या धाग्यांनी कर्नाटकी कशी धामी काडियेला ... हात नका लावू माझ्या साडीला, या वर तर अनेकांनी रंगमंच पुढे येत लावणीचा मनमुराद आनंद घेतला. दिलबरा ... नटले तुमच्यासाठी, उगवली शुक्राची चांदणी, या रावजी बसा भावजी कशी मी राखु तुमची ,म्हणत मराठमोळी अदा रसिकांना भावली. कुणी तरी यावे कवेत घावे ... धडधडतय थरथरतइ... लाही लाही होतंय माझ्या अंगाची हि लावणी परभणीच्या संत तुकाराम कला व विज्ञान महाविद्यालयाच्या सुरेश या विद्यार्थ्याने सादर केली. तसेच सोनखेडच्या लोकमान्य महाविद्यालयाच्या विद्यार्थी कलावंतांनी राया मला प्रीतीच्या झुल्यात झुलवा इश्काचा गुलकंद या लावण्यांनी रसिक प्रेक्षकांना ढोलकीच्या तालावर थिरकण्यास भाग पाडले. अनेक कलावंतांच्या सादरीकरणाने प्रेक्षकांच्या हृदयाचा ठोका चुकविला. लावणी हि महाराष्ट्राची जान आहे, लावणी हि महाराष्ट्राची आग आहे, तसेच लावणी हि महाराष्ट्राचा साज आहे, हीच परंपरा जपत कलावंतांनी आपल्या अदाकारीने यावेळी अनेकांना घुंगराच्या बोलावर मंत्रमुग्ध केले. महाराष्ट्राची कलात्मक परंपरा असलेल्या लावणीने यावेळी अनेकांना घायाळ केले.

लातूर येथील दयानंद कला महाविद्यालयातील श्रद्धा जोशी यांनी चंदनाच्या पलंगी शेज मखमली लाल.. दोन उभा रेशमी, गरम लोकरी शाल. पर झोप नाही आली जागरण झालं काल ,अहो रंग महाली उब असून का काटा फुलतोय नवा बाई, बाई गं बाई झोंबतो गारवा...,जयक्रांती कला महाविद्यालय लातूरच्या ईत्तरगे रुपालीने जगात हो भारी होती एक सवारी, ढोलकी त्याची न्यारी दुनियेला प्यारी. कहाणी त्याची ही खरी खुरी सांगाया आलो की हो दारी. सत्य नाही कटू जरी रसिक धीर ठेवा तरी असं वाजवा की रात जागवा कि..... औसची पूणव हो उद्या कि.... हि बहारदार लावणी सादर करून उपस्थित विद्यार्थ्यांची टाळ्यांद्वारे दाद मिळवली.

एक लावणी कलाकार म्हणते माझी लावणी म्हणजे माझ्या आतडीचे तीळ वाटते. माझ्या गोऱ्या कातडीवरचा धागा हा चांगल्या गालावरचे तीळ वाटते. उरले फक्त एकच ते म्हणजे घुंगरू ते मनासारखे वाजते. घुंगराच्या तालावर डोलणारे हे शरीर अनेकांच्या हृदयाला साद घालते. अश्या या लावणीची कला ह्या युवक महोत्सवामध्ये अनेक लावण्यवती विद्यार्थ्यांनी सादर केल्या. लावणी कलाप्रकारामध्ये एकूण एकतीस महाविद्यालयातील संघांनी सहभाग घेतला होता. यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजेश्वर दुडुकनाळे, स्वागताध्यक्ष तथा सहयोग सेवाभावी संस्थेचे सचिव डॉ. संतुकराव हंबर्डे, जनसंपर्क अधिकारी डॉ अशोक कदम, प्राचार्य विश्वनाथ भरकड यांच्यासह अनेकाची उपस्थिती होती. यशस्वीतेसाठी सल्लागार समितीचे सदस्य यांच्यासह दिलीप पडघन, विष्णू भुसारे, संभा कांबळे, बालाजी शिंदे, सुनील कांबळे आदींनी प्रयत्न करीत आहेत.

# युवक महोत्सव विविध कलाप्रकाराने गाजला

## ▶▶ महोत्सवात तरुणाईचा उत्साह

**नांदेड/प्रतिनिधी**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि सहयोग सेवाभावी संस्थेचे इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहयोग-२०१८' आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवामध्ये भारतरत्न डॉ.अटलबिहारी वाजपेयी मंच्यावर दुपारी पोवाडा या लोककला प्रकाराला सुरुवात झाली. या स्पर्धेत भाग घेणारे महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींची संख्या उल्लेखनीय होती. यातून त्यांनी राष्ट्रमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यांच्यासह स्त्रीमुक्ती, स्त्रीभ्रूण हत्या आणि दहशतवाद आदीवर पोवाड्याच्या माध्यमातून जनजागृती केली.

लातूरच्या जयक्रांती महाविद्यालयाच्या शिरीष बेंबडे या विद्यार्थी कलावंताने दहशतवादाचा पोवाडा साजर केला. त्याला साथ अंकुश, कृष्ण, सुरेश, प्रशांत आणि बालाजी पवार यांनी देऊन सादरीकरण केले. महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूरच्या ऐश्वर्या पांचाळ हीने राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जीवन चरित्रावर पोवाडा सादर केला. लातूरच्या महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाच्या प्रगती गवळीने अटलजींची यांच्या संघर्षगाथेवर पोवाडा सादर करून भारतरत्न अटलजी यांच्या कार्याचा गौरव केला. दयानंद वाणिज्य ,महाविद्यालय लातूरच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य गाथेवर पोवाड्याचे सादरीकरण प्रेक्षकांची दाद मिळवली. पीपल्स महाविद्यालयाच्या शेख अल्लाउद्दीन यांनी महात्मा फुले यांच्या क्रांती गाथा पोवाड्यातून सादर केल्या. एमजीएम आय.टी. महाविद्यालयाच्या अक्षय वांगणकर याने छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्य गाथेतून संभाजी महाराजांचे चरित्र प्रेक्षकांसमोर ठेऊन प्रेक्षकांचे वन्स मोर मिळविला. यासादरीकारांमध्ये साक्षी काळे, प्रगती शिंदे, शुभम कुलकर्णी, गौतम कांबळे, अब्दुल 'डायम साथ दिली. विजय चव्हाण नाट्यमंचावर मूक अभिनयातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्म हत्या, समाजातील जीवंत प्रश्नावर मूक अभिनयाचे सादरीकरण केले. यामध्ये ३३ महाविद्यालयाच्या संघाच्या कलाकारांनी सहभाग घेतला होता. किशोरी आमोणकर कलामंचावर भारतीय सुगम गायन या कलाप्रकारांत ४३ महाविद्यालयाच्या कलाकारांनी सहभाग नोंदवून या कलेचे सादरीकरण सुरु होते. तर विंदा करंदीकर या मंच्यावर आनंदी जीवनाची अनोखी रीत: साहित्य गीत संगीत या विषयावर दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या कु. विधी पळसपुरे, जनआंदोलने दशा आणि दिशा या विषयवर राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या कृष्णा काटवटे विद्यार्थी कलाकारांनी आपले विचार मांडतांना आजची देशातील परिस्थिती साहित्यातील विविध साहित्य लेखन जुन्या व नवीन गीतांचा छंद आणि संगीत हे आपल्या जीवनात किती रुजले आहे या विषयी आपल्या वक्तृत्त्वातून माहिती दिली. वासुदेव गायतोंडे मंचावर कलात्मक जुळवणी आणि व्यंगचित्रकला हा कलाप्रकार घेण्यात आला.

आदर्श गावकरी बुधवार, दि. २६ सप्टेंबर २०१८
3

# युवक महोत्सव विविध कलाप्रकाराने गजला; महोत्सवात तरुणाईचा उत्साह



**नांदेड**–स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि सहयोग सेवाभावी संस्थेचे इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहयोग-२०१८' आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवामध्ये भारतरत्न डॉ. अटलबिहारी वाजपेयी मंचावर दुपारी पोवाडा या लोककला प्रकाराला सुरुवात झाली. या स्पर्धेत भाग घेणारे महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींची संख्या उल्लेखनीय होती. यातून त्यांनी राष्ट्रमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह स्त्रीमुक्ती, स्त्रीभ्रूण हत्या आणि दहशतवाद आदींवर पोवाड्याच्या माध्यमातून जनजागृती केली.

लातूरच्या जयक्रांती महाविद्यालयाच्या शिरीष बेंबडे या विद्यार्थी कलावंताने दहशतवादाचा पोवाडा साजर केला. त्याला साथ अंकुश, कृष्ण, सुरेश, प्रशांत आणि बालाजी पवार यांनी देऊन सादरीकरण केले. महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूरच्या ऐश्वर्या पांचाळ हिने राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जीवन चरित्रावर पोवाडा सादर केला. लातूरच्या महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाच्या प्रगती गवळीने अटलजींची यांच्या संघर्षगाथेवर पोवाडा सादर करून भारतरत्न अटलजी यांच्या कार्याचा गौरव केला. दयानंद वाणिज्य, महाविद्यालय लातूरच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्यगाथेवर पोवाड्याचे सादरीकरण प्रेक्षकांची दाद मिळवली. पीपल्स महाविद्यालयाच्या शेख अल्लाउद्दीन यांनी महात्मा फुले यांच्या क्रांती गाथा पोवाड्यातून सादर केल्या. एमजीएमआयटी महाविद्यालयाच्या अक्षय वांगणकर याने छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्य गाथेतून संभाजी महाराजांचे चरित्र प्रेक्षकांसमोर ठेवून प्रेक्षकांचे वन्स मोर मिळविला. यासादरीकारांमध्ये साक्षी काळे, प्रगती शिंदे, शुभम कुलकर्णी, गौतम कांबळे, अब्दुल डायम साथ दिली.

विजय चव्हाण नाट्यमंचावर मूक अभिनयातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या, समाजातील जीवंत प्रश्नावर मूक अभिनयाचे सादरीकरण केले. यामध्ये ३३ महाविद्यालयाच्या संघाच्या कलाकारांनी सहभाग घेतला होता. किशोरी अमोनकर कलामंचावर भारतीय सुगम गायन या कलाप्रकारांत ४३ महाविद्यालयाच्या कलाकारांनी सहभाग नोंदवून या कलेचे सादरीकरण सुरु होते. तर विंदा करंदीकर या मंच्यावर आनंदी जीवनाची अनोखी रित: साहित्य गीत संगीत या विषयावर दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या कु. विधी पळसपुरे, जनआंदोलने दशा आणि दिशा या विषयवर राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या कृष्णा काटवटे विद्यार्थी कलाकारांनी आपले विचार मांडतांना आजची देशातील परिस्थिती साहित्यातील विविध साहित्य लेखन जुन्या व नवीन गीतांचा छंद आणि संगीत हे आपल्या जीवनात किती रुजले आहे या विषयी आपल्या वत्कृत्त्वातून माहिती दिली. वासुदेव गायतोंडे मंचावर कलात्मक जुळवणी आणि व्यंगचित्रकला हा कलाप्रकार घेण्यात आला.

विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजेश्वर दुडूकनाळे, इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य विश्वनाथ भरकड, सहयोग-२०१८ युवक महोत्सवाचे सचिव प्रा. प्रवीण मुळी, प्राचार्य डॉ. बालाजी गिरगावकर यांच्यासह विद्यार्थी विकास मंडळ आणि युवक महोत्सव सल्लागार समिती सदस्य युवक महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेत आहेत.

# युवा महोत्सवातील विद्यार्थ्यांनी 'सहयोग २०१८' तून दिला लोककलेला उजाळा

नांदेड - स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहयोग २०१८' या युवक महोत्सवाची सुरूवात नुकतीच झाली. या महोत्सवात लोकनृत्य, आदिवासी नृत्य आदी कला प्रकार यावेळी सादर करण्यात आले. या महोत्सवात विद्यार्थ्यांनी लोकनृत्यातून आपल्या प्राचीन आणि आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडवूण आणले. आदिवासी कुटुंबासमोरील अनेक प्रश्नांना या सादरीकरणातून वाचा फोडण्यात आली. यावेळी काठी आग आणि मानवी मनोरे तयार केलेले देखावे प्रेक्षकांना प्रभावित करत होते. धनगर नृत्य, मंगळागौरी पूजन, वाघ्या मुरळी, गौड समाजातील आदिवासी नृत्य आणि भैडाप्याची उधळण करीत मरीआईला प्रसन्न करण्यासाठी पोतराज संस्कृतीचे दर्शन देखील यावेळी घडविले गेले. यावेळी अनेक महाविद्यालयाच्या विद्यार्थी कलावंतांनी केलेल्या सादरीकरणातून आदिवासी जीवनाचे बारकावे, प्रथा, परंपरांची जाणीव घडविताना रसिक प्रेक्षकांची दाद मिळविली.

दिनांक २८ सप्टेंबर २०१८
दैनिक महासागर

4

# आई-वडिलांप्रती कृतज्ञता जोपासा -फ.मु.शिंदे

**नांदेड/प्रतिनिधी**

विदयार्थी मित्रांनो जीवनात आईवडिलांच्या आशिर्वादाशिवाय यशस्वितेची पायरी गाठता येत नाही. आज तुम्ही या युवक महोत्सवामधून विजेते होऊन पारितोषिके मिळवीत आहेत. प्रत्येक पारितोषिकासाठी आई वडिलांची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे आशीर्वादाची शिदोरी सोबत असते व त्यामुळे आई वडिलांप्रती आपण जीवनभर कृतज्ञता जोपासावी, ज्यामुळे नियमितपणे यशस्वितेची पायरी चढत राहाल, असे मत प्रसिद्ध कवी फ. मु. शिंदे यांनी व्यक्त केले.



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि सहयोग सेवाभावी संस्थेचे इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहयोग-२०१८' विद्यापीठ युवक महोत्सवाच्या पारितोषिक वितरण व समारोप समारंभात आज दि. २७ सप्टेंबर रोजी भारतरत्न डॉ. अटल बिहारी वाजपेयी कला मंचावर ते बोलत होते. त्यांच्यासमवेत व्यासपीठावर नांदेड गुरुद्वारा लंगर साहिबचे बाबा अमरदीपसिंघजी, सामाजिक कार्यकर्त्या राजश्रीताई पाटील, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वागताध्यक्ष तथा सहयोग सेवाभावी संस्थेचे सचिव डॉ.संतुकराव हंबर्डे, मा. राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य परमेश्वर हसबे, कुलसचिव डॉ. रमजान मुलानी, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजेश्वर दुडूकनाळे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. दीपक बच्चेवार, डॉ.अशोक टिप्परसे, डॉ.वैजयंता पाटील, डॉ.महेश मगर, अधिसभा सदस्य बालाजी वैजापूर, डॉ. शैलजा वाडीकर, क्रीडा संचालक डॉ. विठ्ठलसिंह परिहार, रासेयोचे समन्वयक डॉ.डी.डी. पवार, विद्यार्थी विकास मंडळ आणि युवक महोत्सव सल्लागार समितीचे सर्व सदस्य यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोपात स्वागताध्यक्ष तथा सहयोग सेवाभावी संस्थेचे सचिव डॉ. संतुकराव हंबर्डे यांनी विद्यार्थ्यांना कानमंत्र दिला. ते म्हणाले, जीवनात यशस्वी झाल्यानंतर अहंकार नसावा, अन्यथा मिळालेले सर्व यश शून्य आहे. जीवनात यश संपादन करा, पण अहंकार अंगी येऊ देऊ नका. सूत्रसंचालक डॉ. सूर्यप्रकाश जाधव यांनी केले तर आभार सहयोग-२०१८ युवक महोत्सवाचे सचिव प्रा.प्रविण मुळी यांनी मानले.

लोकपत्र शुक्रवार, दि.२८ सप्टेंबर २०१८ २

# Misunderstanding makes life miserable: Prof Shinde

## Intercollegiate Youth Festival Sahyog-2018

LOKMAT NEWS NETWORK
NANDED, SEPT 27

"We must understand the things in life properly otherwise we can't lead a contented life. Most of our miseries are the results of our misunderstanding in life," observed noted writer and poet Prof.F M Shinde.

He was addressing the students as the chief guest during the prize distribution and concluding ceremony of the Intercollegiate Youth Festival Sahyog-2018 jointly organised by the SRTM University and the Indira Pharmacy College at Vishnupuri, here on Thursday. Quoting some humorous anecdotes, Prof Shinde gave some useful nuggets of information to live a happy life. He expressed concern over people who misunderstand and misinterpret life. He left the audience into peals of laughter through his speech. Rajashree Hemant Patil urged the students to shape their destiny through hard work and efforts. Principal Vishwanath Bharkad expressed his gratitude for good support from all.



Noted writer and poet Prof. F M Shinde addressing the students during the prize distribution ceremony of the four-day Intercollegiate Youth Fest Sahyog 2018 in Nanded that concluded on Thursday.

Dr.Dhuduknale thanked students for maintaining discipline in the festival

Santukrao Hambarde appealed to the students to leave aside the ego for progress in life. Pallavi Hake of the Dayanand Commerce College, Latur expressed her views as a student representative.

Advisory committee members Dr.Pratap Deshmukh, Dr. Bhagwat, Dr.Vibhute, Dr.Vishwadhar Deshmukh, Mama Jadhav and Sambhaji Kamble, Sunil Kamble, Govindrao Hambarde of the student development took efforts for the success of the fesival. Organiser and BJP Nanded city chief Santukraoji Hambarde was in the chair, while Baba Amarjitsinghji, SRTMU registrar Dr. Ramjan Mulani, social activist Rajashree Patil, management council members Parmeshwar Hasbe, Dr.Deepak Bacchewar, Dr.Ashok Tipperse, Mahesh Magar Dr. Vaijanta Patil, Student development department director Dr.Rajeshwar Dhuduknale, Principal Vishwanath Bharkad were on the dais.

Dr.Surya Prakash Jadhav and Kamalakar Chavan conducted the proceedings while the principal of the host college Dr.Praveen Muli proposed a vote of thanks.

Lokmat Times
www.epaper.lokmat.com/lokmattimes/
FRIDAY | 28 SEPTEMBER 2018
AURANGABAD

पुढारी
शुक्रवार, २८ सप्टेंबर २०१८

# आई-वडिलांप्रती कृतज्ञता जोपासा : फ. मुं. शिंदे

**नांदेड : दिगंबर शिंदे**

जीवनात आई-वडिलांच्या आशीर्वादाशिवाय यशाची पायरी गाठता येत नाही. त्यांच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आशीर्वादाची शिदोरी सोबत असतेच. त्यामुळे आपण जीवनभर त्यांची कृतज्ञता जोपासावी, ज्यामुळे नियमितपणे यशस्वितेची पायरी चढत राहाल, असे मत प्रसिद्ध कवी प्रा. फ. मुं. शिंदे यांनी व्यक्त केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि सहयोग सेवाभावी संस्थेचे इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहयोग-२०१८' विद्यापीठ युवक महोत्सवाच्या पारितोषिक वितरण व समारोप समारंभात आज दि.२७ सप्टेंबर रोजी भारतरत्न डॉ. अटल बिहारी वाजपेयी कला मंचावर ते बोलत होते.

व्यासपीठावर नांदेड गुरुद्वारा लंगर साहिबचे बाबा अमरदीपसिंघजी, सामाजिक कार्यकर्त्या राजश्रीताई पाटील, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वागताध्यक्ष तथा सहयोग सेवाभावी संस्थेचे सचिव डॉ.संतुकराव हंबर्डे, मा. राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य परमेश्वर हसबे, कुलसचिव डॉ. रमजान मुलानी, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजेश्वर दुडूकनाळे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. दीपक बच्चेवार, डॉ.अशोक टिप्परसे, डॉ.वैजयंता पाटील, डॉ.महेश मगर, अधिसभा सदस्य बालाजी वैजापूर, डॉ. शैलजा वाडीकर, क्रीडा संचालक डॉ. विठ्ठलसिंह परिहार, रासेयोचे समन्वयक डॉ.डी.डी. पवार, विद्यार्थी विकास मंडळ आणि युवक महोत्सव सल्लागार समितीचे सर्व सदस्य यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती होती. सामाजिक कार्यकर्त्या राजश्रीताईपाटीलविद्यार्थ्यांनामार्गदर्शन करतांना म्हणाल्या, युवकांच्या ओठावर कोणत्या प्रकारची गाणे येतात यावरूनच त्यांची ओळख होते. मित्रांनो तुम्ही आज येथे शिवाजी महाराजांचा, संभाजी महाराजांचा, आई जिजाऊंचा पोवाडा गायलात, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवनचरित्र जलसाद्वारे गायिले. यावरूनच तुमचे भवितव्य उज्वल आहे, असे तुम्ही सिद्ध केले. या युवक महोत्सवांमधून माधुरी दीक्षित, फ.मु. शिंदे, मकरंद अनासपुरे सारखे मान्यवर तयार व्हावेत, अशी अपेक्षा व्यक्त करून उपस्थित विदयार्थ्यांनी पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय समारोपात स्वागताध्यक्ष तथा सहयोग सेवाभावी संस्थेचे सचिव डॉ.संतुकराव हंबर्डे यांनी विद्यार्थ्यांना कानमंत्र दिला. ते म्हणाले, जीवनात यशस्वी झाल्यानंतर अहंकार नसावा, अन्यथा मिळालेले सर्व यश शून्य आहे. जीवनात यश संपादन करा, पण अहंकार अंगी येऊ देऊ नका. सूत्रसंचालकडॉ. सूर्यप्रकाश जाधव यांनी केले तर आभार सहयोग-२०१८ युवक महोत्सवाचे सचिव प्रा.प्रविण मुळी यांनी मानले.



नांदेड : 'सहयोग-२०१८' विद्यापीठ युवक महोत्सवाच्या समारोपप्रसंगी बोलताना प्रसिद्ध कवी प्रा. फ.मुं. शिंदे. व्यासपीठावर बाबा अमरदीपसिंघजी, डॉ. संतुकराव हंबर्डे, राजश्री पाटील आदी.

## कलाप्रकारच्या संख्येपेक्षा गुणवत्ता महत्त्वाची : दुडुनाळे



**नवीन नांदेड :** युवक महोत्सव साजरा करताना राज भवनाच्या वतीने मान्यता प्राप्त कलाप्रकार विद्यापीठ नित्याने घेवून लोककला जागृत ठेवते. केवळ युवक महोत्सवात कलाप्रकारची संख्या वाढविण्यापेक्षा गुणवत्ता, दर्जा वाढविण्याचा प्रयत्न राहील अशी भूमिका स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, विष्णुपुरी, नांदेडच्या विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक राजेश्वर दुडुकनाळे यांनी सांगितले.

युवक महोत्सव २०१८ दरम्यान संचालक दुडुकनाळे यांच्याशी वार्तालाप करण्यात आला. त्यावेळी मनमुराद दैनिक पुढारी शी वार्तालाप केला, संवाद साधला. माजी विद्यार्थी कलावंतांना विद्यापीठ सन्मान देतो का याविषयावर उत्तर देताना २०१५ रोजी सचिन केरूरकर, विनायक पवार यांचा यापूर्वी केलेला आहे. पवारांनी सुपरीचीत मराठी चित्रपट ख्वाडा आणि बबन यात गितकार तर लातूर येथील आनिल कांबळे यांनी एलीझाबेद एकादशी या चित्रपटात काम केले. तर म्होरक्या, या चित्रपटाला राष्ट्रपती पुरस्कार मिळाला आहे. म्हणुन हे विद्यापीठ कलावंत महाराष्ट्रात परीचीत झाले आहेत. सहयोग २०१८ मधून निवडक ३२ विद्यार्थी घेऊन इंद्रधनुष्य या आंतरविद्यापीठ युवक महोत्सवात पाठवले जाते. ही याची उपलब्धता म्हणावी लागेल. भजन, वासुदेव, कथाकथन, काव्यवाचन हे कला प्रकार युवक महोत्सवात बंद केल्याची ओरड होते. मात्र त्यापुढे जावुन विद्यापीठ केवळ राज भवन मान्यता प्राप्त २४ कलाकृती घेते. आणि ते कलाप्रकार नियमात नाहीत. आजतागायत ७५ महाविद्यालय सहभाग नोंदवत होते. मात्र यावर्षी ही महाविद्यालय संख्या ९२ पर्यंत पोहचली आहे. ही उपलब्धता मनावी लागेल.

## जड अंतकरणाने ...आम्ही जातोय...आमच्या घरी



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व सहयोग सेवाभावी संस्था, विष्णुपुरी, नांदेड येथे दि. २४ ते २७ सप्टेंबर दरम्यान सहयोग २०१८ युवक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. युवक महोत्सवाचा समारोप दि. २७ रोजी झाला. बक्षीसे स्वीकारली. जय - पराजयाचा आनंदाने स्वीकारला. मात्र तीन दिवसांपासुनची झालेली घट्ट मैत्री सोडून जाताना अनेकांची डोळे पाणावली होती.

सहयोग संस्थेच्या माध्यमातून सहयोग २०१८ या युवराज महोत्सवात भोजन, निवास, बस व्यवस्था अतिशय सुंदर, चोख करण्यात आली होती. नित्याने भोजनात चमचमीत खाद्य पदार्थ तयार होते. सादरीकरण झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी आलेल्या विविध वर्तमानपत्र त्या- त्या सहभागी कलावंतांना निशुल्क दिले जात होते. हे सर्व नियोजन अतिशय उत्तम होते. याबाबत आपल्या मनोगतात सहभागी विद्यार्थ्यांनी मुख्य मंचावर मान्यवरांच्या उपस्थितीत सांगितले.

ही महोत्सवात झालेली व्यवस्था चोख बंदोबस्त, नियोजन यामुळे आपल्या जिल्ह्यात, आपल्या गावात जाताना पाऊले पडत नसल्याचे अनेकांनी सांगितले.शेवटी उत्सव हा तीन दिवसांचा होता. महोत्सवाच्या यशस्वी आयोजनाबद्दल विभागातील विविध महाविद्यालयांच्या संचाने विद्यापीठ व सहयोग कॉम्पसचे आभार मानले.

नांदेड । शुक्रवार,२८ सप्टेंबर २०१८ पुण्य नगरी

3

# सुसंगत आयुष्यासाठी समजून घेणे गरजेचे–फ.मु.शिंदे

## युवक महोत्सवाचे सुप वाजले



**नांदेड/प्रतिनिधी**

विसंगती शोधत त्यावर वेळ घालवण्यापेक्षा एकमेकांना समजून घेत सुसंगत आयुष्य जगणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ कवी, साहित्यिक फ.मु. शिंदे यांनी युवक महोत्सवाच्या समारोप कार्यक्रमात केले.

स्वारातीम विद्यापीठाचा युवक महोत्सव सहयोग कॅम्पसमध्ये २४ ते २७ सप्टेंबर कालावधीत पार पडला. गुरुवारी बक्षिस वितरणाने कार्यक्रमाचा समारोप झाला. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव तथा स्वागताध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे होते. यावेळी मंचावर नांदेड गुरुद्वारा लंगर साहिबचे बाबा अमरदीपसिंघजी, सामाजिक कार्यकर्त्या राजश्री हेमंत पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य परमेश्वर हसबे, कुलसचिव डॉ. रमजान मुलानी, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजेश्वर दुडूकनाळे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. दीपक बच्चेवार, डॉ.अशोक टिप्परसे, डॉ.वैजयंता पाटील, डॉ.महेश मगर, अधिसभा सदस्य बालाजी वैजापूरे, डॉ. शैलजा वाडीकर, क्रीडा संचालक डॉ. विठ्ठलसिंह परिहार, रासेयोचे समन्वयक डॉ. डी.डी. पवार, विद्यार्थी विकास मंडळ आणि युवक महोत्सव सल्लागार समितीचे सर्व सदस्य यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना फ.मु. शिंदे म्हणाले, जीवनात आई-वडिलांच्या आशिर्वादाशिवाय यशस्वितेची पायरी गाठता येत नाही. आज तुम्ही या युवक महोत्सवामधून विजेते होऊन पारितोषिके मिळवीत आहात. प्रत्येक पारितोषिकासाठी आई-वडिलांची प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष आशीर्वादाची शिदोरी सोबत असते. त्यामुळे आई-वडिलांप्रती आपण कायम कृतज्ञता जोपासली पाहीजे. जातीपातीवरुन आढळून येणाऱ्या समाजातील विसंगतीवरही त्यांनी कवीतेच्या माध्यमातून प्रहार केले. खड्डयाला खड्डा जोडून रस्ते कसे तयार करतात, असा प्रश्न उपस्थित करुन त्यांनी रस्त्याच्या दयनिय अवस्थेवर मार्मिक टीपन केले. प्रश्न, प्रसंग लक्षात घेवून समजून घेणे गरजेचे असल्याचे सांगत कृतज्ञता जीवनाचे सर्वात मोठे मुल्य असल्याचा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

सामाजिक कार्यकर्त्या राजश्री पाटील यांनी महापुरुषांचा इतिहास (पान ४ वर...)

(पान १ वरून)

## सुसंगत आयुष्यासाठी...

प्रेरणादायी असल्याचे सांगत युवकच देशाचा खरा आधारस्तंभ असून युवकांनी आपली उर्जा सकारात्मक बाबींसाठी वापरावी असे आवाहन केले. आजचे विद्यार्थी उद्याचे कलावंत असून युवक महोत्सव त्यांच्यासाठी हक्काचे व्यासपीठ असल्याचे त्या म्हणाल्या. अध्यक्षीय समारोपात स्वागताध्यक्ष डॉ.संतुकराव हंबर्डे यांनी विद्यार्थ्यांना कानमंत्र दिला. ते म्हणाले, जीवनात यशस्वी झाल्यानंतर अहंकार नसावा, अन्यथा मिळालेले सर्व यश शून्य आहे. जीवनात यश संपादन करा, पण अहंकार अंगी येऊ देऊ नका. कार्यक्रमाचे सुरेख सुत्रसंचालन डॉ. सूर्यप्रकाश जाधव यांनी तर प्रा. प्रविण मुळी यांनी आभार मानले.

# आई-वडिलांप्रती कृतज्ञता जोपासा - फ. मु. शिंदे



*प्रतिनिधी* / २७ सप्टेंबर

**नांदेड :** विद्यार्थी मित्रांनो जीवनात आई वडिलांच्या आशिर्वादाशिवाय यशस्वितेची पायरी गाठता येत नाही. आज तुम्ही या युवक महोत्सवामधून विजेते होऊन पारितोषिके मिळावीत आहेत. प्रत्येक पारितोषिकासाठी आई वडिलांची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे आशीर्वादाची शिदोरी सोबत असतेच त्यामुळे आई वडिलांप्रती आपण जीवनभर कृतज्ञता जोपासावी, ज्यामुळे नियमितपणे यशस्वितेची पायरी चढत राहाल, असे मत प्रसिद्ध कवी फ. मु. शिंदे यांनी व्यक्त केले.

स्वारातीम विद्यापीठ आणि सहयोग सेवाभावी संस्थेचे इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहयोग-२०१८' विद्यापीठ युवक महोत्सवाच्या पारितोषिक वितरण व समारोप समारंभात २७ सप्टेंबर रोजी भारतरत्न डॉ. अटलबिहारी वाजपेयी कला मंचावर ते बोलत होते. त्यांच्यासमवेत व्यासपीठावर नांदेड गुरुद्वारा लंगर साहिबचे बाबा अमरदीपसिंघजी, राजश्रीताई पाटील, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वागताध्यक्ष तथा सहयोग सेवाभावी संस्थेचे सचिव डॉ.संतुकराव हंबर्डे, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य परमेश्वर हसबे, कुलसचिव डॉ. रमजान मुलानी, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजेश्वर दुडूकनाळे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. दीपक बच्चेवार, डॉ.अशोक टिप्परसे, डॉ.वैजयंता पाटील, डॉ.महेश मगर, अधिसभा सदस्य बालाजी वैजापूर, डॉ. शैलजा वाडीकर, क्रीडा संचालक डॉ. विठ्ठलसिंह परिहार, रासेयोचे समन्वयक डॉ.डी.डी. पवार, यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती होती.

सामाजिक कार्यकर्त्या राजश्रीताई पाटील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म्हणाल्या, युवकांच्या ओठावर कोणत्या प्रकारची गाणे येतात यावरूनच त्यांची ओळख होते. मित्रांनो तुम्ही आज येथे शिवाजी महाराजांचा, संभाजी महाराजांचा, आई जिजाऊंचा पोवाडा गायलात, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवनचरित्र जलसाद्वारे गायिले. यावरूनच तुमचे भवितव्य उज्वल आहे, असे तुम्ही सिद्ध केले. या युवक महोत्सवांमधून माधुरी दीक्षित, फ.मु.शिंदे, मकरंद अनासपुरे सारखे मान्यवर तयार व्हावेत, अशी अपेक्षा व्यक्त करून उपस्थित विद्यार्थ्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षीय समारोपात स्वागताध्यक्ष डॉ.संतुकराव हंबर्डे यांनी विद्यार्थ्यांना कानमंत्र दिला. ते म्हणाले, जीवनात यशस्वी झाल्यानंतर अहंकार नसावा, अन्यथा मिळालेले सर्व यश शून्य आहे. जीवनात यश संपादन करा, पण अहंकार अंगी येऊ देऊ नका.

सूत्रसंचालक डॉ. सूर्यप्रकाश जाधव यांनी केले तर आभार 'सहयोग-२०१८' युवक महोत्सवाचे सचिव प्रा.प्रविण मुळी यांनी मानले.

देशोन्नती
शुक्रवार, दि .२८ सप्टेंबर २०१८

3

# आई-वडिलांप्रती कृतज्ञता जोपासा : फ. मु. शिंदे

**प्रतिनिधी**
**नवीन नांदेड, दि. २७ सप्टेंबर -**

विदयार्थी मित्रांनो जीवनात आई वडिलांच्या आशिर्वादाशिवाय यशस्वितेची पायरी गाठता येत नाही. आज तुम्ही या युवक महोत्सवामधून विजेते होऊन पारितोषिके मिळावीत आहेत. प्रत्येक पारितोषिकासाठी आई वडिलांची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे आशीर्वादाची शिदोरी सोबत असतेच त्यामुळे आई वडिलांप्रती आपण जीवनभर कृतज्ञता जोपासावी, ज्यामुळे नियमितपणे यशस्वितेची पायरी चढत राहाल, असे मत प्रसिद्ध कवी फ. मु. शिंदे यांनी व्यक्त केले.



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि सहयोग सेवाभावी संस्थेचे इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहयोग-२०१८' विद्यापीठ युवक महोत्सवाच्या पारितोषिक वितरण व समारोप समारंभात आज दि. २७ सप्टेंबर रोजी भारतरत्न डॉ. अटल बिहारी वाजपेयी कला मंचावर ते बोलत होते. त्यांच्यासमवेत व्यासपीठावर नांदेड गुरुद्वारा लंगर साहिबचे बाबा अमरदीपसिंघजी, सामाजिक कार्यकर्त्या राजश्रीताई पाटील, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वागताध्यक्ष तथा सहयोग सेवाभावी संस्थेचे सचिव डॉ.संतुकराव हंबर्डे, मा. राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य परमेश्वर हसबे, कुलसचिव डॉ. रमजान मुलानी, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजेश्वर दुडूकनाळे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. दीपक बच्चेवार, डॉ.अशोक टिप्परसे, डॉ.वैजयंता पाटील, डॉ.महेश मगर, अधिसभा सदस्य बालाजी वैजापूर, डॉ. शैलजा वाडीकर, क्रीडा संचालक डॉ. विठ्ठलसिंह परिहार, रासेयोचे समन्वयक डॉ.डी.डी. पवार, विद्यार्थी विकास मंडळ आणि युवक महोत्सव सल्लागार समितीचे सर्व सदस्य यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती होती.

सामाजिक कार्यकर्त्या राजश्रीताई पाटील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म्हणाल्या, युवकांच्या ओठावर कोणत्या प्रकारची गाणे येतात यावरूनच त्यांची ओळख होते. मित्रांनो तुम्ही आज येथे शिवाजी महाराजांचा, संभाजी महाराजांचा, आई जिजाऊंचा पोवाडा गायलात, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवनचरित्र जलसाद्वारे गायिले. यावरूनच तुमचे भवितव्य उज्वल आहे, असे तुम्ही सिद्ध केले. या युवक महोत्सवांमधून माधुरी दीक्षित, फ. मु. शिंदे, मकरंद अनासपुरे सारखे मान्यवर तयार व्हावेत, अशी अपेक्षा व्यक्त करून उपस्थित विदयार्थ्यांनी पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षीय समारोपात स्वागताध्यक्ष तथा सहयोग सेवाभावी संस्थेचे सचिव डॉ.संतुकराव हंबर्डे यांनी विद्यार्थ्यांना कानमंत्र दिला. ते म्हणाले, जीवनात यशस्वी झाल्यानंतर अहंकार नसावा, अन्यथा मिळालेले सर्व यश शून्य आहे. जीवनात यश संपादन करा, पण अहंकार अंगी येऊ देऊ नका.

सूत्रसंचालक डॉ. सूर्यप्रकाश जाधव यांनी केले तर आभार सहयोग-२०१८ युवक महोत्सवाचे सचिव प्रा.प्रविण मुळी यांनी मानले.